आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२१ ऑगस्ट २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- उज्ज्वल भविष्यासाठी नवसंशोधन आणि सहकार्यावर भर देण्याचं भारताचं ब्रिक्स देशांना आवाहन

- सरकार सीमांचं संरक्षण करणाऱ्या जवानांच्या कल्याणाला सर्वाधिक प्राधान्य देत असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांच प्रतिपादन

- राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर, महाराष्ट्रातल्या तीन शिक्षकांचा समावेश

- गेल्या दोन दिवसात सोन्याच्या दरात तोळ्यामागे पावणे ७ हजार रुपये, तर चांदीच्या दरात प्रतिकिलो साडे १७ हजार रुपयांची वाढ

**आणि**

- बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत दाखल

**<><><><><>**

उज्ज्वल भविष्यासाठी ब्रिक्स देशांनी नवसंशोधन, सहकार्य आणि आमूलाग्र बदल घडवण्यावर भर द्यावा असं आवाहन भारतानं ब्रिक्स देशांना केलं आहे. ब्रिक्स देशांच्या दूरसंचार मंत्र्यांची १२ वी बैठक आज पुण्यात सुरू झाली. त्यावेळी दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी ही भूमिका मांडली. डिजिटल अडथळे दूर करुन शाश्वत, नवोन्मेषाला चालना देणारी, क्षमता वर्धन करणारी आणि डिजिटल बदल घडवणारी व्यवस्था घडवण्यासाठी सहकार्य वाढवण्याचं आवाहन त्यांनी यावेळी ब्रिक्स देशांना केलं. सर्व संशोधन आणि तंत्रज्ञानात नागरिकांना केंद्रस्थानी ठेवावं असंही ते म्हणाले.

यावेळी भारत आणि ब्राझिलमध्ये सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. दूरसंचार, सायबर सुरक्षा, उद्योन्मुख तंत्रज्ञान, क्षमता विकास आणि तंत्रज्ञानाची देवाणघेवाण वाढवण्यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली.

ब्रिक्स देशांच्या पर्यटन मंत्र्यांची बैठक आज जयपूरमध्ये सुरू झाली.

**<><><><><>**

अंतराळविज्ञान क्षेत्रातल्या २० स्टार्टअप उद्योगांच्या प्रमुखांशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथं संवाद साधला. सर्वसामान्य माणसाचं जीवनमान उंचावण्यासाठी अंतराळविषयक तंत्रज्ञानाचा उपयोग झाला पाहिजे, असं आवाहन मोदी यांनी यावेळी केलं. अंतराळ विज्ञान क्षेत्रात नवीन प्रतिभा, गुंतवणूक आणि कंपन्या आकर्षित करण्याची क्षमता आहे असं सांगून त्याकरता अनुकूल वातावरण तयार करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पश्चिम बंगालमधे सिलिगुडी इथं सशस्त्र सीमा दलाच्या मुख्यालयात १७९ कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं उद्घाटन आणि भूमीपूजन केलं. नेपाळ आणि भूतान या देशांलगतच्या देशाच्या खुल्या सीमांचं रक्षण सशस्त्र सीमादल सक्षमतेने करीत असल्याचं ते यावेळी म्हणाले. भाजपाचं सरकार केंद्रात सत्तेवर आल्यापासून सीमांचं संरक्षण करणाऱ्या जवानांच्या कल्याणाला सर्वाधिक प्राधान्य देत आहे असं त्यांनी सांगितलं. घुसखोरी रोखण्याच्या कामात विद्यमान मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी यांच्या सरकारकडून केंद्राला पूर्ण सहकार्य मिळत आहे, असं ते म्हणाले......

**होल्ड – बाईट- अमित शहा**

सिलिगुडी इथं नवीन फौजदारी कायद्यांसंदर्भातल्या प्रदर्शनाचं उद्घाटनही शहा यांच्या हस्ते झालं. बिधाननगर पोलीस आयुक्तालयाच्या नवीन कार्यालयाचं तसंच नॉर्थ बेंगाल वैद्यकीय महाविद्यालयातल्या व्यसनमुक्ती केंद्राचं उद्घाटनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

गेल्या महिनाभरात साखर किलोमागे सरासरी साडे ७ रुपयांनी महाग झाली आहे. विविध कारणांमुळं ही दरवाढ झाल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. अपेक्षेपेक्षा कमी उत्पादन, सणासुदीच्या काळामुळं वाढलेली मागणी, हवामानामुळं ऊसाच्या पीकाचं झालेलं नुकसान, जागतिक पातळीवर कमी झालेला साखर पुरवठा तसंच काही साखर कारखाने आणि व्यापाऱ्यांनी केलेल्या साठेबाजीमुळं देशात साखरेचा भाव वाढल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

यंदाच्या हंगामात ३४३ लाख मेट्रीक टन साखरेचं उत्पादन अपेक्षित होतं. पण देशात केवळ ३०६ लाख मेट्रीक टन साखरेचं उत्पादन झालंय. त्यातच जागतिक जागतिक पातळीवर ३३ लाख मेट्रीक टन साखरेचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळं जगभरात २ महिन्यात साखरेचे दर १६ टक्क्यानं वाढल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. देशात सध्या पुरेशी साखर उपलब्ध असून ही दरवाढ आटोक्यात ठेवण्यासाठी विविध उपाययोजना सुरू असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलंय.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या ३ शिक्षकांसह एकंदर ४८ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार आज जाहीर झाले. केजच्या साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या शिक्षिका डॉक्टर कविता गित्ते, नाशिक महानगरपालिकेच्या १८ क्रमांक शाळेतल्या शिक्षिका कुंदा बच्छाव आणि साताऱ्याच्या सैनिकी शाळेतले शिक्षक शिवप्रसाद टिंगरे यांना यंदा या पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे. येत्या ५ सप्टेंबर रोजी शिक्षकदिनी त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

**<><><><><>**

गेल्या दोन दिवसात सोन्याचे दर तोळ्यामागे पावणे ७ हजार रुपयांनी तर चांदीचे दर साडे १७ हजार रुपयांनी वाढले आहेत. त्यामुळं सोनं आणि चांदी ३

महिन्यातल्या उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत. सणासुदीमुळं वाढलेली मागणी यासह इतर कारणांमुळं हे दर वाढल्याचं तज्ज्ञांनी सांगितल. मुंबईत आज एक तोळा सोनं साडे ३ हजार रुपयांनी आणि चांदी सुमारे ९ हजार रुपयांनी महाग झाली. त्यामुळं एका तोळा २४ कॅरेट सोनं १ लाख ६५ हजार रुपयांना, २२ कॅरेट सोनं १ लाख ६१ हजार रुपयांना मिळत होतं. एक किलो चांदीसाठी मुंबईत २ लाख ५४ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागत होती.

**<><><><><>**

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत मोबाईल फोन उत्पादन योजनेचं उदघाटन केलं. केंद्रीय मंत्रिमंडळानं गेल्या महिन्यात या योजनेला मंजुरी दिली असून सुमारे ६२ हजार पाचशे कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गेल्या १ एप्रिलपासून ही योजना अमलात आल्याचं वैष्णव यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

सीएसआर अर्थात कॉर्पोरेट सामाजिक दायित्वनिधीचा अधिक प्रभावी वापर करण्यासाठी ‘महा सीएसआर प्राधिकरण’ करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत. कॉर्पोरेट सामाजिक दायित्वाच्या क्षेत्रातील विविध उपक्रम सध्या वेगवेगळ्या पातळ्यांवर आणि स्वतंत्रपणे राबवले जातात. त्यांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी या प्राधिकरणाची आवश्यकता असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**<><><><><>**

बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली. अटीतटीच्या सामन्यात त्यांनी चीनच्या जोडीचा पराभव केला. सामन्यातला पहिला गेम १६-२१ असा गमावल्यानंतर दुसऱ्या गेममध्ये त्रिसा आणि गायत्री यांनी

जोरदार पुनरागमन केलं आणि हा गेम २१-१५, तर  तिसरा गेम २१-१३ नं जिंकून सामन्यात विजय मिळवला. यामुळे या स्पर्धेतलं त्यांचं पदक निश्चित झालं आहे.

पुरुष दुहेरीत मात्र भारताचं आव्हान संपुष्टात आलं. सात्त्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीला चीनच्या जोडीनं २१-१८, २१-९ असं सहज नमवलं.

**<><><><><>**

भारताच्या काजल ढोचक हिनं सलग दुसऱ्यांना २० वर्षांखालच्या जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरलं. महिलांच्या ७६ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात तिनं चीनच्या प्रतिस्पर्ध्याचा ७-० असा दणदणीत पराभव केला. या स्पर्धेतलं तिचं हे सलग दुसरं जेतेपद आहे. दुसरीकडे ७२ किलो वजनी गटात तनू शर्मा हिला रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं. ६२ किलो वजनी गटातही सवितानं रौप्यपदकाची कमाई केली. ६८ किलो वजनी गटात मानसी लाठेर ही सुवर्णपदकाची प्रबळ उमेदवार आहे.

**//<><><><><>//**